# मराठी विज्ञान परिषद

विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, शीव (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ दूरध्वनी : ०२२ ४८२६ ००९४, ०२२ ४८२६ ३७५०
ई-मेल : office@mavipa.org संकेतस्थळ : www.mavipa.org



नोंदणी क्रमांक : सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट : BOM 81/66/GBBSD दिनांक : 12-8-1966
बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट : F-1429 (BOM) दिनांक : 06-09-1966 ■ PAN No : AAATM0981C
12-A (a) नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक: AAATM0981CE19662 दिनांक : 30-09-2021
आयकर सवलत 80-G प्रमाणपत्र क्रमांक AAATM0981CF20213 दिनांक : 24-09-2021 कायमस्वरूपी
परकीय चलनातील देणग्या स्विकारण्यास मान्यता प्रमाणपत्र क्रमांक – 084020008 दिनांक : 14-05-2017



**अध्यक्ष**
प्रा. ज्येष्ठराज जोशी

**उपाध्यक्ष**
प्रा. सुधीर पानसे
डॉ. स्मिता लेले
प्रा. संजय देऊळगावकर

**कार्यवाह**
श्री. अ. पां. देशपांडे
श्री. दिलीप हेर्लेकर
प्रा. भालचंद्र भणगे

**कोषाध्यक्ष**
डॉ. दिलीप साठे

**विश्वस्त**
डॉ. विजय केळकर
श्री. प्रमोद लेले
डॉ. वसुधा कामत
प्रा. सुहास पेडणेकर
डॉ. अश्विनी भालेराव गांधी
डॉ. अविनाश सुपे
श्री. रावसाहेब पाटील

**व्यवस्थापकीय संचालक**
श्री. राजेश समेळ


दिनांक : ५ जुलै २०२५
सं.क्र. ८४ / मविप / २०२५

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक

**विषय : व्ही.डी. चौगुले आणि मोरेश्वर मुकुंदराव मोहिले पारितोषिके तथा अकरावे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन**

सप्रेम नमस्कार

मराठी विज्ञान परिषद ही स्वयंसेवी संस्था मराठीतून विज्ञान प्रसार व प्रचाराचे कार्य १९६६ सालापासून महाराष्ट्रभर सातत्याने करत आहे. या उद्देशाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्वसामान्य जनता यांच्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम अंमलात आणले जातात. यापैकी विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम हे कृतिप्रधान असतात, जेणेकरून विषय समजणे सोपे जाते तद्वतच संबंधीत नियम / तत्त्व लक्षात राहाणे सुलभ होते. याचसारखा विद्यार्थ्यांसाठीचा प्रकल्प स्पर्धेचा उपक्रम परिषद तीन वर्षांतून एकदा घेते, तो या वर्षी होणार आहे.

ह्या स्पर्धेत आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी **व्ही.डी. चौगूले पारितोषिके** असून अकरावी / बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी **मोरेश्वर मुकुंदराव मोहिले पारितोषिके** आहेत. स्पर्धेची सविस्तर माहिती सोबतच्या पत्रकात दिली आहे, तसेच ती परिषदेच्या संकेतस्थळावर www.mavipa.org उपलब्ध आहे. **गेल्या वेळच्या विजेत्या प्रकल्पांचे संपादित अहवाल आपल्याला परिषदेच्या संकेतस्थळावर वाचायला मिळतील.**

या प्रकल्प स्पर्धेबरोबरच **अकरावे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन दि. १५, १६, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी वरोरा जि. चंद्रपूर** येथे आयोजित केले आहे. पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांबरोबर किमान दर्जा असलेले प्रकल्प बालविज्ञान संमेलनातील सहभागासाठी निवडले जातात. या सगळ्या विद्यार्थ्यांना दोन दिवसात चार कृतिसत्रात सहभागी होता येते. तसेच सर्वांना प्रकल्प सादरीकरणाची संधी दिली जाते. भविष्याच्या दृष्टीने सादरीकरणाची संधी उपयुक्त आहे.

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प करायला सांगा. या प्रकल्पांचे अहवाल परीक्षणासाठी मराठी विज्ञान परिषदेला मिळण्याची **शेवटची तारीख १५ सप्टेंबर २०२५** आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी तयारी सुरू करायला हवी.

आपल्याकडून सहकार्याच्या अपेक्षेत!

**दिलीप हेर्लेकर**
कार्यवाह

## व्ही.डी.चौगुले आणि मोरेश्वर मुकुंदराव मोहिले पारितोषिक योजना
## आणि
## अकरावे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन

मराठी विज्ञान परिषदेतर्फे शालेय विद्यार्थ्यांकरिता अनेक उपक्रम घेण्यात येतात. त्यापैकी एक म्हणजे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन. १९९५ साली पहिले राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन मुंबईत यशस्वीरीत्या साजरे झाले. ह्या संमेलनाला मिळालेला चांगला प्रतिसाद पाहून मुंबईतील **व्ही.डी. चौगुले फाउंडेशन फॉर रिसर्च अँड एज्युकेशन ट्रस्टतर्फे,** तसेच कालांतराने परिषदेचे हितचिंतक **सुनील मोहिले आणि कुटुंबीय** यांच्याकडून मराठी विज्ञान परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठीच्या एका योजनेस अर्थसाहाय्य मिळाले.

विद्यार्थ्यांनी सद्य:स्थितीतील वेगवेगळ्या प्रश्नांचा अभ्यास करावा, त्यावर विचार करून ते समजून घ्यावे, त्याची मांडणी शास्त्रीय पद्धतीने करून (त्यावर काही तोडगा मिळतो का) निष्कर्षाप्रत यावे, ह्यासाठी या पारितोषिक योजनेची आखणी करण्यात आलेली आहे. इयत्ता आठवी ते दहावीकरिता **व्ही.डी. चौगुले पारितोषिके** आहेत. ही पारितोषिके **प्रथम** रु. ४,०००/-, **द्वितीय** रु. ३,०००/-, **तृतीय** रु. २,०००/- अशी असून **याखेरीज पाच उत्तेजनार्थ** पारितोषिके प्रत्येकी रु. १,०००/- दिली जातील. याचप्रमाणे इयत्ता अकरावी व बारावीतील विद्यार्थ्यांसाठी **मोरेश्वर मुकुंदराव मोहिले पारितोषिके** आहेत. ही पारितोषिके प्रथम रु. ५,०००/-, द्वितीय रु. ४,०००/- आणि तृतीय रु. ३०००/- अशी असून याखेरीज तीन उत्तेजनार्थ पारितोषिके (प्रत्येकी रु. १०००/-) दिली जातील. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन म्हणून पारितषिके देण्यात येतील. शिक्षकांच्या पारितोषिकाची रक्कम विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या रकमेच्या १० टक्के असेल.

**पारितोषिकांची संख्या आणि निवड याबाबत मराठी विज्ञान परिषदेचा निर्णय अंतिम असेल.**

महाराष्ट्र राज्यस्तरावर ही योजना १९९८ सालापासून तीन वर्षांतून एकदा अमलात आणली जाते. तसेच दर वेळी त्याला जोडून **राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन** आयोजित केले जात आहे. त्यानुसार २०२५-२०२६ या वर्षी ही चौगुले व मोहिले पारितोषिक योजना अमलात आणली जात असून त्याला जोडून **अकरावे राज्यस्तरीय बालविज्ञान संमेलन** दि. १५, १६ व १७ नोव्हेंबर २०२५ रोजी **वरोरा, जि. चंद्रपूर** येथे आयोजित केले आहे. या संमेलनात सदर पारितोषिके वितरित केली जातील. यासाठी विद्यार्थ्यांनी - वरीलप्रमाणे गटानुसार - शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले प्रकल्प दि. **१५ सप्टेंबर २०२५पर्यंत** मराठी विज्ञान परिषदेकडे पाठवावेत. प्रकल्पाची मांडणी करताना परिषदेच्या अपेक्षा काय आहेत, त्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्यावेत.

१. प्रकल्पाचा विषय – तो निवडण्याचा उद्देश / कारणे
२. या विषयावर पूर्वी झालेले काम - संबंधित माहिती (थोडक्यात)
३. विषयाच्या अनुषंगाने संदर्भ वा माहिती कोणत्या मार्गाने गोळा केली (वाचन, मार्गदर्शन, कृतीद्वारे, अनुभवाने, प्रसारमाध्यमाद्वारे, इंटरनेटद्वारे इत्यादी). **निव्वळ माहिती संकलन नको.**
४. संदर्भ - माहितीच्या आधारे कृती – प्रयोग रचना, प्रतिकृती (गरज असल्यास) कशी केली?
५. निरीक्षण नोंदी – निरीक्षणाची मांडणी, मोजमापन व बारकावे कसे नोंदवले?
६. सातत्याने कृती करून निरीक्षण पडताळणी - वेगवेगळ्या पद्धतीने व / वा वेगवेगळ्या परिस्थितीत कृती करणे व निरीक्षणे नोंदवणे (विषयानुरूप ठरवावे)
७. निरीक्षणाची मांडणी - तक्ते, आलेख इत्यादी पद्धतीने करावी. प्रश्नावलीचा वापर करून सर्वेक्षण केले असेल तर प्रश्नावलीचा नमुना जोडावा.
८. निरीक्षणाचे वर्गीकरण – विषयाच्या अनुषंगाने कसे केले?
९. निरीक्षणावरून निष्कर्ष कोणते काढले? त्याची कारणमीमांसा.
१०. ज्या उद्देशाने प्रकल्प हाती घेतला, त्याला अनुसरून निष्कर्षाचे विवेचन अपेक्षित.

११. निष्कर्षाच्या आधारे काही नवीन कल्पना सुचल्या का? **जिथे आवश्यक असेल तिथेच प्रतिकृती करावी, अनिवार्य नाही.**

अशा पद्धतीने पूर्ण केलेले प्रकल्प अहवाल (लिखाण, आकृत्या, रेखाचित्रे, तक्ते, आलेख इत्यादीसह) विद्यार्थ्यांने आपले पूर्ण नाव, घरचा पूर्ण पत्ता (पिनकोडसहित), भ्रमणध्वनी, इमेल आणि शाळेचे नाव व पत्ता, तसेच हा प्रकल्प सबंधित विद्यार्थ्यांने केला आहे असे शाळेच्या मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र आणि मार्गदर्शक शिक्षकाचा भ्रमणध्वनी (व्हॉट्स ॲप) व इ-मेल यासह **मराठी विज्ञान परिषद** विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी (पूर्व), मुंबई ४०००२२ येथे पाठवावा. (दूरध्वनी क्र. ०२२-४८२६३७५० / ४८२६ ००९४, भ्रमणध्वनी (व्हॉट्स ॲप) ९९६९१००९६१ – **साप्ताहिक सुट्टी मंगळवार**) लिखाणासाठी ए-४ आकाराचा कागद वापरावा, तसेच प्रकल्प अहवाल १५ ते २० पानांचा असावा अशी अपेक्षा आहे. **एका प्रकल्पाकरिता जास्तीत जास्त दोन विद्यार्थ्यांनी काम केल्यास चालेल, त्यापेक्षा जास्त विद्यार्थी एका प्रकल्पात नकोत.** मार्गदर्शनाच्या हेतूने मुद्दे सुचवले आहेत, विषयानुरूप सगळेच लागू होतील असे नाही, याची नोंद घ्यावी. प्रकल्प अहवालाची एक प्रत विद्यार्थ्यांनी स्वत:जवळ ठेवावी. **प्रकल्प अहवाल परिषदेकडे पाठवताना दोन प्रती पाठवाव्या.**

नमुना म्हणून काही विषय सुचवत आहे, पण या स्पर्धेला विषयाचे बंधन नाही.

**विषयसूची**

१. तापमानवाढीची कारणे, त्याचे अनेकविध परिणाम आणि त्यावर उपाय (स्थानिक आणि जागतिक).
२. पाणी समस्या – पाणीपुरवठा योजना, लोकसंख्या, जनावरसंख्या इत्यादींना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होतो का? नसल्यास पाणीपुरवठ्याचे उपाय, पाणीबचतीचे उपाय, पर्जन्य जलसंचयन (रेन वॉटर हार्वेस्टिंग).
३. प्लास्टिक शाप की वरदान? उपयुक्तता व गैरसोय, गैरवापर, त्यावर तोडगा, पुनर्वापर, पुन:चक्रीकरण वगैरे.
४. घनकचरा समस्या – शहरी / ग्रामीण भागात – दुष्परिणाम, ग्रामस्वच्छता अभियान, लोकसहभाग, उपयुक्तता व उपलब्धी, शहर स्वच्छता स्पर्धा, सहभाग व यश / अपयश.
५. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था योग्य व पुरेशी आहे का? फायदे तोटे उदाहरणासहित.
६. एकूण सण-उत्सवात पर्यावरण रक्षणाचे धोरण, व्यावहारिक उपाय.
७. दिवाळीत फटाके वाजवावेत का? फायदे, तोटे, प्रदूषण, अपव्यय, पर्याय.
८. वीजपुरवठा – पुरेसा का कमी? कारणे, अडचणी, उपाय – तात्कालिक व कायमस्वरूपी.
९. ऊर्जानिर्मिती – पारंपरिक की अपारंपरिक? योग्य / अयोग्य, सर्व अंगांनी किफायतशीर की महाग?
१०. कागदाचा वापर आणि पर्यावरण – कागद बचतीचे वेगवेगळे उपाय, पुनर्वापराचे मार्ग, अन्य पर्याय.
११. शेतकऱ्यांच्या समस्या – अडचणी, तोडगे – स्थानिक व सार्वत्रिक, अंमलबजावणी, लोकसहभाग, त्यासाठीचे मार्ग. आधुनिक तंत्रज्ञाचा वापर.
१२. आपल्या भागातील वृक्षसंपदा – वैशिष्ट्ये, गुणधर्म, उपयोग, सर्वेक्षण, सध्याचे वृक्ष स्थानिकरीत्या अनुकूल आहेत का? जीवविविधता.
१३. स्थानिकरीत्या उपलब्ध भाज्या, फळे, धान्य यांचा अभ्यास – किती प्रमाणात स्थानिक उत्पादन, इतर ठिकाणाहून आणतो त्याचे उत्पादन गावात होऊ शकते का, स्थानिकरीत्या अनुकूल उत्पादन मोठ्या प्रमाणात बाहेर पाठवता येईल का? मार्ग कोणते? गावाच्या विकासात उपयुक्तता?
१४. दैनंदिन जीवनातील विज्ञान आणि आपला दृष्टीकोन, वागणूक योग्य की अयोग्य.
१५. सार्वजनिक आरोग्यव्यवस्था – पुरेशी आहे का? नसल्यास उपाय कोणते?
१६. मोबाइल वापराचे फायदे व तोटे – यात सर्वेक्षणाचा अंतर्भाव असावा.
१७. वायुप्रदूषण / जलप्रदूषण / ध्वनिप्रदूषण – कारणे व उपाय जागतिक तसेच स्थानिक (सर्वेक्षणाची जोड हवी.)